RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक ३३] शनिवार, मार्च २, २०१९/फाल्गुन ११, शके १९४० [पृष्ठे ११, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ मार्च २०१९

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१८/९४३/प्र.क्र.८८/म-१.—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटल्यामुळे, याव्दारे, यासोबत जोडलेल्या परिशिष्टाच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेख तथा दस्तांवर (यात ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त संलेख तथा दस्त" असा करण्यात आला आहे), उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-१ च्या अनुच्छेदांतर्गत आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावर उक्त अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम ४ च्या खंड (दोन), कलम ३२अ च्या पोट-कलम २ आणि पोट-कलम ४ च्या पहिल्या परंतूकानुसार तसेच कलम ३९ च्या पोट-कलम १ च्या खंड (ख) च्या तरतुदीनुसार लागू होणारी एकूण शास्ती ही, पुढील अटी तथा शर्तींच्या अधीन राहून, १०% पर्यंत कमी करीत आहे :—

१. मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावर देय शास्ती कमी करण्याकरिता अर्ज दाखल करण्याचा कालावधी हा, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** हा आदेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पुढे सहा महिने इतका असेल (यात ज्याचा उल्लेख यापुढे "उक्त कालावधी" असा करण्यात आला आहे).

२. सदर आदेशाखाली देण्यात येणारी शास्तीच्या कपातीची सवलत ही, केवळ दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी किंवा त्यापूर्वी, निष्पादित करण्यात आलेल्या उक्त नमूद संलेख तथा दस्तांनाच लागू असेल.

३. अर्जदाराने उक्त कालावधीच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, मूळ संलेख आणि त्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक दस्तऐवजांच्या स्वयंस्वाक्षांकित प्रतींसह, यासोबत जोडलेल्या नमुना 'अ' मध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

४. सदर आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापूर्वी, उक्त नमूद अशा कोणत्याही संलेख तथा दस्तावर, मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावर देय असलेली शास्ती आधीच भरण्यात आली असेल तर, त्याचा कोणताही परतावा दिला जाणार नाही.

५. संबंधित संलेख तथा दस्ताच्या पक्षकारास किंवा त्याच्या मालकीहक्काच्या उतराधिकाऱ्यास किंवा मुखत्यारनामाधारकास, या आदेशाखाली शास्ती कमी करण्यासाठी अर्ज करता येईल.

६. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी निष्पादित केलेल्या संलेख तथा दस्तांव्यतिरिक्त, मुद्रांक न लावलेले तसेच साध्या कागदावर निष्पादित केलेले संलेख तथा दस्त, या आदेशाखालील कोणत्याही लाभासाठी पात्र असणार नाहीत.

७. संबंधित मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याने काढलेली मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत, या आदेशानुसार शुल्काच्या उर्वरित भागाची आणि शास्तीची रक्कम अर्जदाराने भरणे आवश्यक असेल, तसे न केल्यास असा अर्जदार, या आदेशाअंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभांसाठी पात्र असणार नाही.

८. निर्धारणाच्या प्रयोजनाकरिता, अर्जदाराने, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिद्ध केलेल्या वार्षिक दर विवरणपत्रातील आवश्यकतेनुसार आणि त्यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शन तत्वांनुसार, त्याबाबतचा उचित पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

९. उक्त नमूद संलेख तथा दस्तांपैकी ज्यांच्याबाबतीत, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(४), ३२अ, ३३ किंवा ३३ अ किंवा ४६ खाली अगोदरच कार्यवाही सुरू करण्यात आली असेल किंवा उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली कोणत्याही न्यायालयापुढे किंवा प्राधिकरणापुढे निर्णयासाठी अपील किंवा पुनरीक्षण अर्ज प्रलंबित असेल असे संलेख तथा दस्त देखील या आदेशांखालील लाभांसाठी पात्र असतील. तथापि, या आदेशाखालील उक्त लाभ उपभोगण्याकरिता अर्जदारास यासोबत जोडलेल्या नमुना 'अ' मध्ये मूळ स्वरुपात नवीन अर्ज करावा लागेल :

परंतु, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार कोणत्याही न्यायालयापुढे किंवा प्राधिकरणापुढे निर्णयासाठी अपील किंवा पुनरीक्षण अर्ज प्रलंबित असेल अशा बाबतीत, अर्जदारास तो खटला-बिनशर्त मागे घ्यावा लागेल आणि या आदेशांखाली करावयाच्या अर्जासोबत तशा आशयाचे घोषणापत्र सादर करावे लागेल.

१०. उक्त नमूद संलेख तथा दस्तांपैकी जे संलेख तथा दस्त हे, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडून यापूर्वी, (१) परिपत्र क्र.एसटीपी-१०९४/प्र.क्र.३६९/म-१, दि.११ मे, १९९४, (२) मुद्रांक-१०९७/३१६०/प्र.क्र.५६१/म-१, दि. ५ जुलै, १९९७, (३) मुद्रांक-१०९८/१००४/प्र.क्र.१९०/म-१, दि.२६ नोव्हेंबर, १९९८, (४) मुद्रांक-२००३/ प्र.क्र.१८५/म-१, दि.२४ जानेवारी, २००४ आणि (५) मुद्रांक-२००७/९२२/ प्र.क्र.१९९/म-१, दि. ७ जून, २००८ याव्दारे अधिसूचित केलेल्या माफी योजनेमध्ये अगोदरच दाखल करण्यात आले होते, परंतु ज्यांच्याबाबतीत यापूर्वीच्या माफी योजनांतर्गत लागू असलेले मुद्रांक शुल्क आणि शास्ती अद्याप भरण्यात आलेली नाही, असे संलेखदेखील या आदेशांखाली शास्तीमधील कपातीस पात्र असतील. तथापि, या आदेशाखालील उक्त लाभ उपभोगण्याकरिता संबंधित अर्जदारास यासोबत जोडलेल्या नमुना 'अ' मध्ये मूळ स्वरुपात नवीन अर्ज करावा लागेल.

**परिशिष्ट**

| अनु. क्र. (१) | संलेखाचे वर्णन (२) | उक्त अधिनियमाच्या अनुसूची-१ खालील अनुच्छेद (३) |
| --- | --- | --- |
| १ | निवासी वापराच्या प्रयोजनार्थ, स्थावर मालमत्तेच्या भाडेदारीच्या हस्तांतरणाच्या संबंधातील करार किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख. | ५(ग-ड) |
| २ | शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच त्यांची विभागीय मंडळे यांच्या निवासी किंवा अनिवासी घटक तथा युनिटांच्या किंवा दोन्हींच्या, यथास्थिती प्रकरणपरत्वे, वाटपाचे किंवा हस्तांतरणाचे किंवा विक्रीचे अभिहस्तांतरणपत्र. | २५(ब) किंवा यथास्थिति प्रकरणपरत्वे, दि.२५ एप्रिल, २०१२ च्या पूर्वी विद्यमान असल्याप्रमाणे २५(ड) |
| ३. | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याच्या प्रयोजनार्थ, झोपडपट्टीधारकाला वाटप केलेल्या निवासी किंवा अनिवासी घटक तथा युनिटांच्या किंवा दोन्हींच्या, यथास्थिती प्रकरणपरत्वे, वाटपाचे अभिहस्तांतरणपत्र आणि त्याचे त्यानंतरचे किंवा त्यापुढील हस्तांतरणे. | २५(ब) किंवा यथास्थिति प्रकरणपरत्वे, दि.२५ एप्रिल, २०१२ च्या पूर्वी विद्यमान असल्याप्रमाणे २५(ड) |
| ४. | महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ (१९६३ चा महा. ४५) च्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये मानीव अभिहस्तांतरणाकरिता जी पात्र आहेत किंवा ज्यांचे मानीव अभिहस्तांतरण प्रलंबित आहे. अशी, नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील निवासी घटक तथा युनिटांच्या वाटपाचे किंवा हस्तांतरणाचे किंवा विक्रीचे अभिहस्तांतरणपत्र. | २५(ब) किंवा यथास्थिति प्रकरणपरत्वे, दि.२५ एप्रिल, २०१२ च्या पूर्वी विद्यमान असल्याप्रमाणे २५(ड) |

**अर्ज- अ**

**अर्जाचा नमुना**

दिनांक:

अर्जदाराचे नाव :
पत्ता :
भ्रमणध्वनी /दूरध्वनी क्रमांक :
ई-मेल पत्ता :
पॅन क्रमांक :
बँकेचे नाव व खाते क्रमांक :

प्रति,

मुद्रांक जिल्हाधिकारी,
..........................................................
..........................................................

**विषय :** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीखाली शुल्काच्या तुटीच्या भागावर देय असलेली शास्ती कमी करण्याकरिता अर्ज.

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आदेश क्र. मुद्रांक-२०१८/९४३/ प्र.क्र.८८/म-१, दि....*....

महोदय,

मी, खाली स्वाक्षरी करणारा/करणारी, श्री. / श्रीमती /.....................माझ्या वतीने किंवा श्री. / श्रीमती.................................यांच्या वतीने असे कळवित आहे की, माझ्या प्रकरणावर आपल्यामार्फत कार्यवाही चालू आहे. (असल्यास) त्याबाबतचा तपशील भाग-अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे आणि / किंवा, मी आता याव्दारे, संदर्भाधीन आदेशाखाली, भाग-ब मध्ये नमूद केलेल्या संलेख तथा दस्तावरील मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील शास्तीत सूट मिळण्यासाठी अर्ज करीत आहे.

**भाग-अ (जुने प्रकरण, असल्यास)**

**पूर्वीच्या अभय योजनेअंतर्गत सादर केलेल्या दस्ताऐवजांचा तपशील पुढीलप्रमाणे :—**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव व पत्ता | : | |
| २. | अभय तथा माफी योजनेचे वर्ष | : | |
| ३. | अगोदरची नोटीस किंवा निर्णय किंवा आदेश याचा तपशील | : | |
| ४. | नोंदणी किंवा प्रकरण क्रमांक | : | |
| ५. | कार्यालयाचे नाव | : | |
| ६. | नोटीस क्रमांक | : | |
| ७. | नोटीशीचा दिनांक | : | |
| ८. | मुद्रांक शुल्काची रक्कम | : | |
| ९. | शास्तीची रक्कम | : | |

**भाग-ब**

**संलेखाचा तपशील :-**

१. दस्तऐवजाचा प्रकार :-

| अनुक्रमांक<br>(१) | संलेखाचे वर्णन<br>(२) | कृपया जे लागू आहे त्यास √ अशी खूण करावी<br>(३) |
|---|---|---|
| (अ) | निवासी वापराच्या प्रयोजनार्थ, स्थावर मालमत्तेच्या भाडेदारीच्या हस्तांतरणाच्या संबंधातील करार किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख. | |
| (ब) | शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच त्यांची विभागीय मंडळे यांच्या निवासी किंवा अनिवासी घटक तथा युनिटांच्या किंवा दोन्हींच्या, यथास्थिती प्रकरणपरत्वे, वाटपाचे किंवा हस्तांतरणाचे किंवा विक्रीचे अभिहस्तांतरणपत्र. | |
| (क) | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याच्या प्रयोजनार्थ, झोपडपट्टीधारकाला वाटप केलेल्या निवासी किंवा अनिवासी घटक तथा युनिटांच्या किंवा दोन्हींच्या, यथास्थिती प्रकरणपरत्वे, वाटपाचे अभिहस्तांतरणपत्र आणि त्याचे त्यानंतरचे किंवा त्यापुढील हस्तांतरणे. | |
| (ड) | महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ (१९६३ चा महा.४५) च्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये मानीव अभिहस्तांतरणाकरिता जी पात्र आहेत किंवा ज्यांचे मानीव अभिहस्तांतरण प्रलंबित आहे. अशी, नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील निवासी घटक तथा युनिटांच्या वाटपाचे किंवा हस्तांतरणाचे किंवा विक्रीचे अभिहस्तांतरणपत्र. | |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | निष्पादनाचा दिनांक | : | |
| ३. | मान्य केलेला मोबदला | : | |
| ४. | मालमत्तेचा तपशील | : | |
| | (अ) मालमत्तेचा सविस्तर पत्ता (सदनिका/युनिट क्रमांक, इमारत क्रमांक व नाव, स्थान इत्यादी) | : | |
| | (ब) गाव/क्षेत्र/प्रभाग इत्यादी | : | |
| | (क) अनुक्रमांक/शहर भूमापन क्रमांक/सीटीएस क्रमांक /भूखंड क्रमांक इत्यादी | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | मालमत्तेचे क्षेत्रफळ | | सदनिका | रोहाऊस/ बंगला/ ड्युप्लेक्स / | दुकान (केवळ झोपुक्षे योजनेंतर्गत) | गच्ची | वाहनतळ |
| | चटईक्षेत्र | | | | | | |
| | बांधीव क्षेत्र | | | | | | |
| ६. | बाजारमूल्य प्रभावित करणारे अन्य घटक | | | | | | |
| | (अ) बांधकामाचा प्रकार | : | | | | | |
| | (ब) बांधकामाचे वर्ष | : | | | | | |
| | (क) मजल्यांची संख्या | : | | | | | |
| | (ड) उद्वाहन (हो/नाही) | : | | | | | |
| ७. | संलेख तथा दस्तावर अगोदरच कोणतेही मुद्रांक शुल्क भरले असल्यास, | | | | | | |
| | (अ) रक्कम रुपये | : | | | | | |
| | (ब) मुद्रांकाचा दिनांक | : | | | | | |
| ८. | प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा तपशील (मुखत्यारनामासह) | | | | | | |
| | व्यक्तीचे नाव | : | | | | | |
| | भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | | | |
| | ई-मेल पत्ता | : | | | | | |

मी, याव्दारे असे घोषित करतो की, वरील माहिती ही, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी व अचूक आहे.

मी उपरोक्त घोषित केलेल्या तपशिलाच्या पुष्ट्यर्थ स्वयं साक्षांकित पुरावे जोडले आहेत.

मी असेही घोषित करतो की, मी, महाराष्ट्र शासन आदेश क्र.मुद्रांक-२०१८/९४३/प्र.क्र.८८/म-१, दि १ मार्च २०१९ मध्ये नमूद अटी तथा शर्तीचे पालन करीन.

आपला विश्वासू,

दिनांक :
ठिकाण:

(स्वाक्षरी)
अर्जदाराचे नाव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
कार्यासन अधिकारी.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, dated 1st March 2019

**Order**

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2018/943/C.R.No.88/M-1.—In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as 'the said Act') and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces the penalty to ten per cent. of the total penalty on the deficient portion of duty payable as per sub-section *(4)* of section 31, first proviso to sub-section *(2)* and sub-section *(4)* of section 32A and clause *(b)* of sub-section *(1)* of section 39 of the said Act, in respect of instruments as specified in column *(2)* of the Appendix hereto (hereinafter referred to as 'the said Instruments'), for which duty is chargeable under articles of Schedule-I appended to the said Act, specified in column *(*3*)* of the Appendix, subject to the following conditions, namely :—

(1) The period for filing application for reduction in penalty on the deficient portion of duty, shall be the six months from the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette* (hereinafter referred to as "the said period").

(2) The said reduction under this order shall be applicable only to the said instruments, which are executed on or before 31st December 2018.

(3) The applicant shall submit an application in the Form 'A' appended hereto, along with original instrument and self-attested copies of supporting documents on or before the last day of the said period.

(4) No refund shall be granted where penalty on the deficient portion of duty has already been paid on any of such instruments, prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette.*

(5) The party to the instrument or his successor in title or power of attorney holder may apply for reduction of penalty under this Order.

(6) Unstamped instruments which are executed on plain papers shall not be eligible for any benefit under this order; except the instruments executed by Maharashtra Housing and Area Development Authority, City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited and Slum Rehabilitation Authority.

(7) The applicant shall be required to pay the deficient portion of duty and penalty as per this Order within a period of sixty days from the date of receipt of the demand notice issued by the concerned Collector of Stamps, failing which the applicant shall not be entitled for the benefits provided under this Order.

(8) For the purpose of assessment, the applicant has to submit proper evidence thereof as per requirements in the Annual Statement of Rates and Guidelines issued by the Chief Controlling Revenue Authority, Maharashtra State.

(9) The said instruments, for which action under section 31(4), 32A, 33 or 33A or 46 of the said Act has already been initiated or where appeal or review application is pending for decision, before any Court or Authority under the provisions of the said Act, shall be entitled for the benefits under this Order. However, to avail of the benefits under this Order, the applicant shall have to make a fresh application in original in the Form 'A' appended hereto:

Provided that, in case where appeal or review application is pending for decision, before any Court or Authority under the provisions of the said Act, the applicant shall have to unconditionally withdraw the case and submit a declaration to that effect along with application under this Order.

(10) The said instruments which were already submitted in the previous Amnesty Schemes notified *vide* Government of Maharashtra Notifications, Revenue and Forests Department, (1) Circular No.STP. 1094/CR-369/M-1, dated 11th May, 1994 (2) Mudrank.1097/3160/CR-561/M-1, dated 5th July, 1997 (3) Mudrank.1098/1004/CR-190/M-1 dated 26th November, 1998 (4) Mudrank.2003/CR-185/M-1, dated 24th January, 2004 and (5) Mudrank. 2007/922/CR-199/M-1, dated 7th June, 2008, but where stamp duty and penalty under the previous Amnesty Schemes have not been paid as yet, are also eligible for the reduction in penalty under this Order. However, to avail of the reduction in penalty under this Order, the applicant shall have to make a fresh application in original in the Form 'A' appended hereto.

*APPENDIX*

| Sr. No. | Description of Instruments. | Articles under Schedule I to the said Act. |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Agreement or its records or Memorandum of agreement if relating to transfer of tenancy of immovable property for the purpose of residential use. | 5*(g-d)* |
| 2 | Conveyance of allotment or transfer or sale of residential or non-residential units or both, as the case may be, of City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited and Maharashtra Housing and Area Development Authority alongwith its Divisional boards. | 25*(b)* or 25*(d),* as existing prior to 25th April, 2012, as the case may be. |
| 3 | Conveyance of residential or non-residential units or both, as the case may be, allotted to a slum dweller for the purposes of rehabilitation under a Slum Rehabilitation Scheme and its subsequent or further transfers. | 25*(b)* or 25*(d),* as existing prior to 25th April, 2012, as the case may be. |
| 4 | Conveyance of allotment or transfer or sale of residential units in registered Co-operative Housing Societies which are eligible for deemed conveyance under the provisions of the Maharashtra Ownership Flats (Regulation of the promotion of construction, sale, management and transfer) Act, 1963 (Mah. XLV of 1963) and Rules framed thereunder or whose deemed conveyance is pending. | 25*(b)* or 25*(d),* as existing prior to 25th April, 2012, as the case may be. |

FORM A

**FORM OF APPLICATION**

Date :

NAME OF APPLICANT :
ADDRESS :
Mobile / Phone No. :
Email ID :
PAN Number :
Bank Name and Account Number :

To,

The Collector of Stamps,
…………………………….….
……………………..………….

**Subject :** Application for reduction in penalty on the deficient portion of duty payable under the provisions of Maharashtra Stamp Act.

**Reference :** Government of Maharashtra Order No. Mudrank-2018/943/ C.R.No.88/M-1., dated the ……………………….…….

Sir,

I, the undersigned, Shri / Smt. …………………….. for myself or on behalf of Shri / Smt. … ……………….., inform that my case is under process in your good office, the details of which are as mentioned in Part-A (if any) and / or I now hereby apply for remission of penalty on the deficient portion of the stamp duty under the Order under reference on the instrument mentioned in Part-B.

**Part -A (Old case, if any)**

**Details of the document submitted under previous amnesty scheme are as follows :–**

1. Office Name and Address :
2. Amnesty Scheme Year :
3. Details of earlier notice or decision or order :
4. Registration or Case Number :
5. Name of Office :
6. Notice Number :
7. Date of Notice :
8. Amount of Stamp duty :
9. Amount of Penalty :

**Part - B**

**Details of Instruments.—**

1. Type of document :—

| Sr. No. (1) | Description of Instruments. (2) | Please √ which is applicable. (3) |
|---|---|---|
| (a) | Agreement or its records or Memorandum of agreement if relating to transfer of tenancy of immovable property for the purpose of residential use. | |
| (b) | Conveyance of allotment or transfer or sale of residential or non-residential units or both, as the case may be, of City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited and Maharashtra Housing and Area Development Authority alongwith its Divisional Boards. | |
| (c) | Conveyance of residential or non-residential units or both, as the case may be, allotted to a slum dweller for the purposes of rehabilitation under a Slum Rehabilitation Scheme and its subsequent or further transfers. | |
| (d) | Conveyance of allotment or transfer or sale of residential units in registered Co-operative Housing Societies which are eligible for deemed conveyance or whose deemed conveyance is pending. | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. | Date of execution | : | | | | | |
| 3. | Agreed consideration | : | | | | | |
| 4. | Details of the property | : | | | | | |
| | (a) Detailed address of property (Flat / Unit No., Building No. and Name, Location, etc.) | : | | | | | |
| | (b) Village / Area / Ward, etc. | : | | | | | |
| | (c) S.No. / C.S.No. / C.T.S. No. / Plot No., etc. | : | | | | | |
| 5. | Area of property | | Flat | Row House / Bungalow / Duplex | Shop (Under SRA Scheme only) | Terrace | Parking |
| | Carpet Area | | | | | | |
| | Built-up Area | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | Other factors affecting the market value | | |
| | (a) Type of Construction | : | |
| | (b) Year of Construction | : | |
| | (c) No. of Floors. | : | |
| | (d) Lift ( Yes / No ) | : | |
| 7. | Stamp duty already paid, if any, on the document. | | |
| | (a) Amount Rs. | : | |
| | (b) Date of stamping | : | |
| 8. | Details of the person authorized (along with Power of Attorney) | | |
| | Name of person | : | |
| | Mobile Number | : | |
| | E-Mail ID | : | |

I hereby declare that the above information is true and correct to the best of my knowledge and belief. I have enclosed the self-attested proofs in support of the above declared details.

I further declare that I shall abide by the conditions specified in the Government of Maharashtra Order No.Mudrank-2018/943/C.R.No.88/M-1, dated the 1st March, 2019.

Yours faithfully,

Date :

Place:

(Signature)

Name of applicant

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.